# <u>अनूचे स्वप्न</u>

अनूला तिची कारखान्यातली नोकरी अजिबात आवडत नव्हती. त्यामुळे कामाचा विचार मनातून काढून टाकत ती चालली होती. तेवढ्यात तिला बाजूच्या दुकानात रचून ठेवलेल्या कुंड्या दिसल्या. अनूच्या मनात विचार सुरु झाले...

दररोज अनूचे लक्ष दुकानाकडे जाई. कुंड्या तश्याच होत्या. एक दिवस धीर करून ती दुकानात गेली. तिने विचारले, “या कुंड्या नाहीतरी पडूनच आहेत, तर मला थोड्या देता का?”

दुकानातून थोड्या कुंड्या घेऊन ती घरी आली. तिने कुंड्या मागच्या गच्चीत रचून ठेवल्या. तिच्या मनातले विचार चालूच होते.

असेच काही दिवस गेले. अनूला एका दुकानात माती आणि बिया दिसल्या. माती स्वस्तही होती. माती घेऊन चालतच ती घरी गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच अनू गच्चीत गेली. तिने सगळ्या कुंड्यांमध्ये माती घातली. सगळ्यात मोठ्या कुंड्यांमध्ये टोमाटो, त्यापेक्षा लहान कुंड्यांमध्ये काकड्या आणि सगळ्यात लहान कुंड्यांमध्ये फुले लावली.

रात्री झोपल्यानंतर तिच्या डोळ्यांपुढे फुलांचे ताटवे येऊ लागले. जागेपणी देखील तिला आपल्याच बागेतल्या भाज्यांचे विचार येऊ लागले. रसाळ टोमाटो आणि काकड्या खायला किती मजा येईल? काकडीची कोशिंबीर किती छान होईल? आणि बागेतली फुले कारखान्यातल्या मैत्रिणींना देता येतील. त्या तर विचारातील की कुठल्या फुलांच्या दुकानावर धाड टाकली?

एक दिवस खूपच गरम झाले. अनूला तिच्या रोपांची काळजी वाटू लागली. ती भरभर चालतच घरी पोहोचली. गच्चीत जाऊन पाहते तो काय, तिच्या रोपांनी माना टाकल्या होत्या. ती आगदी सुकून गेली होती. अनूनी त्यांना पाणी घालायला सुरुवात केली. आता समोरच्या घराची सावली तिच्या रोपांवर पडली होती. थोड्याच वेळात रोपे पुन्हा तरारली. तेव्हाकुठे अनूच्या जिवात जीव आला.

अंधार पडेपर्यंत अनू तिच्या बागेत बसून राहिली. नंतर सुद्धा तिच्या डोक्यात विचार होते आपल्या दुकानाचे, आणि तिथे विकायला ठेवलेल्या आपल्याच बागेतल्या भाज्यांचे.

रचून काय काय ठेवतात?

एक दिवस धीर करून... (तुम्ही काय केले ते लिहा.)

अनू श्रीमंत होती का गरीब? तुम्हाला तसे का वाटते?

एका दिवशी अनूला तिच्या रोपांची काळजी का वाटली?

अनू आत्ता काय करते? तिचे स्वप्न काय आहे?

विरुद्ध अर्थाचे वाक्प्रयोग धड्यातून शोधून लिहा:

माना टाकणे ----------------------------------------------------------

काळजी वाटणे ----------------------------------------------------------